महाराष्ट्र शासन
कार्यालय पोलीस
अधीक्षक, यवतमाळ
एल. आय. सी. चौक,

E-mail ID - sp.yavatmal@mahapolice.go
दुरध्वनी क्र. ०७२३२ - २५६७०१


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र. – पोअय///२०२४/ य

दिनांक - दि. 13/11/2024

## मा. मुख्यमंत्री महोदय यांनी केले"Operation Prasthan" या उपक्रमाचे कौतुक

महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री मा. श्री देवेंद्रजी फडणवीस साहेब यांना आज दि. 29/09/2025 रोजी यवतमाळ जिल्हा पोलीस विभागाच्या "Operation Prasthan" या उपक्रमांतर्गत महिला सक्षमीकरण, आत्मसंरक्षण कराटे प्रात्यक्षिकाचे सादरीकरण करण्यात आले. या कार्यक्रमात वेद्धारीणी शाळा येथील "Operation Prasthan" अंतर्गत प्रशीक्षण दिलेल्या विद्यार्थिनींनी आत्मसंरक्षणाच्या विविध कराटे कलेचे प्रभावी प्रात्यक्षिक सादर केले. या प्रसंगी मा. मुख्यमंत्री महोदय उपस्थित राहून त्यांनी या उपक्रमाचे मनापासून कौतुक केले. अतिवृष्टीमुळे महाराष्ट्रात भीषण पूरस्थिती निर्माण झाली आहे, त्यामुळे यवतमाळ जिल्ह्याचे पोलीस अधिक्षक श्री. कुमार चिंता यांनी जिल्हा पोलीस दलातील सर्व अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना मुख्यमंत्री मदत निधीत स्वेच्छेने योगदान देण्याचे भावनिक आवाहन केले. यवतमाळ जिल्हा हा प्रामुख्याने कृषीप्रधान जिल्हा असल्याने, दुर्दैवाने यापूर्वी मोठ्या प्रमाणात शेतकरी आत्महत्या झाल्या आहे. बहुतेक अधिकारी आणि कर्मचारी स्वतः शेतकरी कुटुंबातील असल्याने अशा कठीण काळात शेतकऱ्यांना येणाऱ्या संघर्षाबद्दल आणि अडचणीबद्दल त्यांना सहानुभूती आहे. या आवाहनाला प्रतिसाद देत यवतमाळ पोलीस दलातील अधिकारी आणि कर्मचारी यांनी मुख्यमंत्री मदत निधीत एकूण 27,11,111 रुपयांचे स्वेच्छेने योगदान दिले. हा धनादेश औपचारिकपणे माननीय मुख्यमंत्री साहेबाना सुपूर्द करण्यात आला.

शुभांगी रा. गुल्हाने
जनसंपर्क अधिकारी, (सपोनी.)
पोलीस अधिक्षक कार्यालय, यवतमाळ

Scanned with OKEN Scanner